# इये वेदांताचिये नगरी

**श्री. चंद्रशेखर मुद्‌गल**

### देवी भागवत

अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी म्हणजे दिनांक ८ ते १६ ऑक्टोबर २०१० या दरम्यान श्री दत्त देवस्थानात वेदमूर्ती श्रीकृष्णशास्त्री जोशी यांनी 'देवी भागवत' सांगितले. सकाळी संहिता वाचन व दुपारी निरूपण असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. संहितावाचन वेदमूर्ती भालचंद्रशास्त्री जोशी यांनी केले आणि निरूपण वेदमूर्ती श्रीकृष्णशास्त्री जोशी यांनी केले.

पहिल्या दिवशी श्री गणेश, आदिशक्ती जगदंबा व भगवंताला नमन करून, शुक-शौनकादिकांचे स्मरण करून, व्यासांना वंदन करून प्रारंभ झाला.

या देवी भागवत समाप्तीच्या वेळी ९ कुमारिका व ९ सुवासिनींचे पूजन करून त्यांची ओटी भरण्यात आली.

या ९ दिवसात देवीच्या कथा ऐकून निरनिराळे शास्त्रोल्लेख ऐकून भक्तांना खूप आनंद झाला व मार्गदर्शनही मिळाले.

### दीपावली

तपोवनात सवत्स धेनूची यथासांग पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बुधवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०१० रोजी गोवत्स द्वादशी साजरी झाली. ह्या दिवसाला गुरुद्वादशीचे औचित्य साधून अनेक भक्तांनी सद्‌गुरुचरणी सेवा अर्पण करून दर्शन घेतले. गोवत्स द्वादशी पासूनच देवस्थानात पणत्या लावण्यास सुरुवात झाली. तसेच श्रीदत्तक्षेत्राच्या प्रांगणात भव्य असा आकाशदिवाही लावण्यात आला.

शुक्रवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०१० रोजी सायंकाळी लक्ष्मीपूजन संपन्न झाले. लक्ष्मीपूजनानंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

### वैकुंठ चतुर्दशी

कार्तिक शुद्ध चतुर्दशी म्हणजे वैकुंठ चतुर्दशी! आवळीच्या वृक्षाखाली हरिहरांची भेट झाली म्हणून या दिवशी आवळीपूजनाचे महत्त्व असते. दिनांक २० नोव्हेंबर २०१० रोजी तपोवनामध्ये आवळीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. आवळी पूजनानंतर उपस्थित भक्तवृंदांनी शिवमहिम्न व विष्णुसहस्रनाम स्तोत्राचे पठण केले. आवळीच्या वृक्षावर विद्युत रोषणाई केली होती.

### त्रिपुरारी पौर्णिमा

वैकुंठ चतुर्दशीचा दुसरा दिवस म्हणजे त्रिपुरारी पौर्णिमा. रविवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०१० रोजी देवस्थानात 'दीपोत्सव' साजरा करून त्रिपुरारी पौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न झाला. अज्ञानरूपी अंध: काराचा नाश होऊन समृद्धी व ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र उजळू दे, हीच भावना मनात एक-एक पणती पेटवताना होती.

प. पू. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे सायंकाळच्या आरतीच्या वेळी कानडी आरती सुरू होताच दीप प्रज्वलनास सुरुवात झाली. सर्वप्रथम गर्भगृहासमोरील व अधिष्ठानासमोरील चांदीच्या पणत्या विश्वस्तांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आल्या. त्यानंतर हजारो दीप प्रज्वलित झाले.

हजारो दीपांच्या मंद प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर श्रीदत्तमंदिर विशेष खुलून दिसत होते. हे विलोभनीय दृश्य आणि सभोवतालचे वातावरण स्वर्गीय सुखाची अनुभूती देत होते. कल्पवृक्षाभोवती शेकडो पणत्या लावण्यात आल्या होत्या. प्रकाशमान झालेला कल्पवृक्ष पाहण्याचा आनंद काही वेगळाच होता. या शिवाय श्री लक्ष्मीमंडप, श्री दत्तात्रेय निवास, वेदांत वेद्यापीठ या वास्तूंवर देखील दीप प्रज्वलित करण्यात आले होते.

### भागवत सप्ताह

दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे यावर्षीदेखील बुधवार, दिनांक ८ डिसेंबर ते गुरुवार, दिनांक १६ डिसेंबर २०१० या दरम्यान भागवत सप्ताहाचे अयोजन करण्यात आले होते. पहिल्या

दिवशी गोकर्ण माहात्म्य कथन, त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून सात दिवस सकाळी संहिता वाचन व दुपारी निरूपण आणि शेवटच्या दिवशी गीता व विष्णुसहस्रनामाचे पठण अशा शास्त्रोक्त पद्धतीने सप्ताह करण्यात आला.

### श्री दत्तात्रेय जयंती

श्रीदत्त देवस्थानात गाणगापूरच्या प्रथेप्रमाणे मार्गशीर्ष शुद्ध १४ ला श्री दत्त जयंती साजरी केली जाते. त्याप्रमाणे सोमवार, दिनांक २० डिसेंबर २०१० रोजी श्री दत्त जयंती सोहळा संपन्न झाला. मंगळवार, दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी पारण्याचा कार्यक्रम होऊन दोन दिवसाचा श्री दत्त जयंती उत्सव आनंदात, भक्तिभावात साजरा झाला. प. पू. सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणे प्रत्येक उत्सव साजरा करताना प्रामुख्याने त्यास वैदिक अनुष्ठानाची जोड असावी यानुसार श्री दत्त जयंतीच्या निमित्ताने दिनांक १४ ते२० डिसेंबर पर्यंत 'ऋग्वेद संहिता स्वाहाकार' यागाचे आयोजन केले होते.

श्री दत्तात्रेय जयंतीच्या दिवशी पहाटे ४ वाजता भगवान श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीला १११ लिटर दुधाचा रुद्राभिषेक व पवमानसूक्ताभिषेक करण्यात आला. त्यानंतर षोडशोपचारे पूजा होऊन सकाळी ७ वाजता आरती झाली. आरतीनंतर दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. श्री दत्तात्रेय जयंती निमित्ताने सुरू असलेल्या यागाची पूर्णाहुती त्याच दिवशी सकाळी ९ वाजता झाली. यागाचे यजमानपद विश्वस्त श्री. कॅप्टन श्रीकांत धर्माधिकारी यांनी भूषविले.

श्री दत्तात्रेय जन्माचा मुख्य कार्यक्रम दुपारी ११.३० वाजता वैदिक मंत्रांच्या उच्चारणात सुरू झाला. सनई चौघड्यांच्या मंगलमयी सुरांच्या पार्श्वभूमीवर दुपारी १२ वाजता लयबद्ध आरती होऊन श्री दत्त जन्म साजरा झाला. यावेळी नगर महिला सत्संगातील भगिनींनी श्री दत्त जन्माचा पाळणा म्हटला.

विश्वस्त मंडळ व सर्व सत्संग मंडळातर्फे प. पू. सद्‌गुरूंची पाद्यपूजा करण्यात आली. सत्संग मंडळांचे पदाधिकारी व विश्वस्तांनी गुरुचरणांवर केशर-अत्तर लेपन करून पुष्पहार अर्पण केला. पाद्यपूजेनंतर प. पू. सद्‌गुरूंच्या आशीर्वादाच्या ध्वनीफीतीचे श्रवण करण्यात आले. आशीर्वादानंतर आरती व पसायदान होऊन पाद्यपूजेच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दुपारच्या सत्रात विद्वान व वैदिक विद्वानांच्या सत्काराचा कार्यक्रम लक्ष्मीमंडपात आयोजित केला होता. यावर्षी वैदिकांच्या सत्काराबरोबरच नगरच्या 'राष्ट्रपती पारितोषिक' विजेत्या दोन ज्येष्ठ विद्वानांचाही सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्तींपैकी वैदिक विद्वानांचा परिचय वेदमूर्ती श्री. कोल्हटकर गुरुजी यांनी करून दिला. सत्कारमूर्ती वेदशास्त्रसंपन्न देवदत्तशास्त्री पाटील यांचा परिचय करून देताना ते म्हणाले की, 'पाटील शास्त्री यांनी प्रथम ऋग्वेद शाकल शाखेचे अध्ययन पूर्ण केले. नंतर वाराणसी येथे ज्योतिष, गणित तसेच न्यायशास्त्राचे प्राथमिक अध्ययन केले. इ. स. १९९७ मध्ये कोणीही न दिलेली श्री शृंगेरी शारदापीठाची न्यायशास्त्राची सर्वोच्च परीक्षा देऊन 'विद्वत्प्रवर' ही पदवी मिळवली. १९९९ मध्ये आळंदी येथे अध्यापनास प्रारंभ केला. आत्तापर्यंत त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनीही न्यायशास्त्राची शृंगेरीची सर्वोच्च परीक्षा दिली. इ. स. २०१० मध्ये श्री शृंगेरी मठात 'मीमांसाशास्त्राची' सर्वोच्च परीक्षा दिली. याशिवाय त्यांना श्रीबादरायण व्यास पुरस्कार, अद्वैत सिद्धिरत्नाकर इत्यादी अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. यानंतर वेदमूर्ती श्री. वामन हळबे यांचा परिचय करून देताना ते म्हणाले की, 'हळबे गुरुजी यांचे घराणेच श्रेष्ठ वंशातील असून वडील श्री. पुंडलिकबुवा हळबे यांनी वेदाध्ययनानंतर नारदीय कीर्तनाच्या माध्यमातून वेदधर्माचा प्रसार केला. वेदमूर्ती श्री. वामन हळबे गुरुजींनी सुमारे ११ ते १२ वर्षात षडंगांसह घनपाठाचे अध्ययन करून वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी ऋग्वेदाचे मुखोद्‌गत घनपारायण केले. राष्ट्रपती पारितोषिक विजेते नगरचे श्री. बोपर्डीकर सर व श्री. खरवंडीकर सर या दोन्ही सत्कारमूर्तींचा परिचय संस्कृतचे प्राध्यापक व गाढे अभ्यासक श्री. श्रीकांत केळकर यांनी करून दिला.

श्रीदत्तात्रेय जयंती उत्सवाला परिपूर्ण करणारा क्षण म्हणजे पालखी सोहळा! सायंकाळी ६.३० वाजता आरतीला सुरुवात झाली. आरतीनंतर ठीक ७.३० वाजता भगवंताचे पालखीतून आगमन झाले. 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा...' म्हणत पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. प्रत्येक थांब्याला भक्तिगीतांची सेवा सादर करण्यात आली. पालखी प्रदक्षिणेच्या दरम्यान शोभेचे दारुकाम व आतषबाजी करण्यात आली. पालखीच्या तीन प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर गानसेवा करणाऱ्यांना देवस्थानतर्फे प्रसाद देण्यात आला.

मंगळवार, दिनांक २१ डिसेंबर २०१० म्हणजेच मार्गशीर्ष पौर्णिमेला, श्री दत्तात्रेय जयंतीचा पारण्याचा दिवस संपन्न झाला. उपस्थित भक्तांनी सकाळी देवतांचे व प. पू. सद्‌गुरु पादुकांचे दर्शन घेतले. दुपारच्या आरतीनंतर सर्वांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतला. त्यानंतर श्री दत्तात्रेय जयंतीच्या दोन दिवसाच्या उत्सवाची सांगता झाली.